॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव- ४२५००१
## NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON- 425001
P.B.NO. 80, UMAVI NAGAR, JALGAON – 425 001 (M.S.)

Grade-B (2.88)
(NAAC Re-Accredited)

B.B.Patil,
Deputy Registrar

भ.भा.पाटील,
उपकुलसचिव

जा.क्र. उमवि/ ५/ टे-३/ नवीन अभि.महा./ ७६७ / २०१०.

दिनांक: २१/१२/२०१०

प्रति,
मा.अध्यक्ष,
जामिया इस्लामिया इशातुल उलूम,अक्कलकुवा,
जि. नंदुरबार.

**विषय:-** शै. वर्ष 2010-11 पासून नवीन अभियांत्रिकी विद्याशाखेच्या संलग्नीकरणाबाबत.. ....

**संदर्भ:** १) अखिल भारतीय तकनिकी शिक्षा परिषद,नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F-No.West/१-५७७४८३१/२०१०/New]
दि.13 जुलै,2010
२)महाराष्ट्र शासन आदेश क्रमांक टिईएम/२०१०/(१६५/१०)/तांशि-४, दिनांक ३०/०६/२०१०

**महोदय,**

अखिल भारतीय तकनिकी शिक्षा परिषद,नवी दिल्ली व महाराष्ट्र शासनाने उपरोक्त संदर्भिय क्र.1व 2 चे निर्णयानुसार नवीन अभियांत्रिकी विद्याशाखेचे महाविद्यालय सुरु करणेस मान्यता प्रदान केली आहे. त्याअनुषंगाने प्राप्त आदेशान्वये आपल्या संस्थेच्या नवीन महाविद्यालयाची तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी विद्यापीठाव्दारा स्थानिक चौकशी समितींची नियुक्ती करण्यांत आली होती. स्थानिक चौकशी समित्यांनी आपल्या संस्थेच्या नवीन महाविद्यालयास भेट देवून विद्यापीठास अहवाल सादर केलेले असून मा.कुलगुरु महोदयांकडून सदरच्या अहवालांच्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 चे कलम 14(7) अन्वये मा.विद्या परिषदेच्या वतीने मला दिलेल्या निर्देशानुसार आपणांस कळविण्यात येते की, आपल्या नविन महाविद्यालयास महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम, 1994 चे कलम 83 (4) नुसार अभियांत्रिकी विद्याशाखेच्या **बी.ई.- सिव्हील इंजिनिअरींग (60), मेकॅनिकल इंजिनिअरींग (60), इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग (60) कॉम्प्युटर इंजिनिअरींग (60), इ.अॅण्ड टि.सी. (60) या** अभ्यासक्रमास आपल्या संस्थेच्या **जामिया इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड मॅनेजमेंट स्टडीज, मोलगी रोड, आमलीबारी फाटा,अक्कलकुवा, जि. नंदुरबार या** महाविद्यालयास **शै.वर्ष 2010-11 साठी** (**प्रत्येकी 60 विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह**) उपरोक्त संदर्भीय शासन आदेशातील अटी व शर्ती तसेच खालील अटींच्या अधिन राहून संलग्नता मान्य करण्यात येत आहे.

1) **स्थानिक चौकशी समितीच्या अहवालात नमूद केलेल्या अटी/त्रुटींची तीन महिन्यांच्या आंत पूर्तता करावी.**
2) **परीनियम 415(1) नुसार आवश्यक तेवढया नियमित शिक्षकांची नियुक्ती करून त्यांचे प्रस्ताव विद्यापीठाच्या व्याख्याता मान्यता विभागास सादर करून त्यांच्या नियुक्तीस विद्यापीठाची मान्यता घेण्यात यावी.**
3) **विद्यापीठाचा अध्यादेश 172 नुसार आवश्यक त्या निधी राष्ट्रीयकृत बँकेत मुदत ठेव म्हणून ठेवण्यात याव्यात**

विद्यापीठाची पडताळणी समिती आपल्या परिसंस्थेस भेट देईल तेव्हा या सर्व बाबींची व वरील अटींची आपण पूर्तता केली असल्याची खात्री करेल व त्या अनुषंगाने विद्यापीठास अहवाल सादर करेल. सदर अहवालावर आपल्या महाविद्यालयाच्या 2011-12 या शैक्षणिक वर्षातील संलग्नीकरणाचे नुतनीकरण अवलंबून राहील.

आपणांस संलग्नीकरणाच्या नुतनीकरणाचा प्रस्ताव दरवर्षी सादर करणे आवश्यक आहे .

**म.कळावे,**

आपला विश्वासु,
उपकुलसचिव
(संलग्नता)

**सोबत :- स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाची झेरॉक्स प्रत**

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी:-

1. मा.अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-32.
2. मा.संचालक, तंत्र शिक्षण, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य-3, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्र.1967, मुंबई.
3. मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, शिक्षण संचालनालय, मध्यवर्ती इमारत, पुणे-1.
4. मा.सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नवीन शासकीय तंत्रनिकेतन परिसर, पो.बॉ.क्र.219, सामनगांवरोड,नाशिकरोड, नाशिक.
5. मा.सहसंचालक, उच्च शिक्षण, प्रशासकीय इमारतीच्या मागे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग, जीवनधारा बिल्डींग, दुसरा मजला, जळगांव.
6. मा.परीक्षा नियंत्रक, उमवि, जळगांव.7. मा.पध्दती विश्लेषक,संगणक विभाग,उमवि,जळगांव.8. मा.उपकुलसचिव परीक्षा विभाग, उमवि, जळगाव.

PHONE: (0257) 2257223, 2257255
Web Site : www.nmu.ac.in

Fax No : (0257) 2258403/406
E-mail:ar-dev@nmu.ac.in
: bpatilp@gmail.com

(नमुना प्रत)

# स्थानिक चौकशी समिती अहवाल (२०१०-११)

संलग्नीत महाविद्यालये - १) विस्तार (नवीन विषय/अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा)
२) नैसर्गिक विस्तार
**३) नवीन महाविद्यालय**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | महाविद्यालयाचे नांव (नवीन महाविद्यालय असल्यास संस्थेचे महाविद्यालयाचे नांव स्वतंत्रपणे लिहावे) | : | जामिया इस्लामिया ईशातुल उलुम संचलित, जामिया इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअरींग अँड मॅनेजमेंट स्टडीज, अक्कलकुवा जि.- नंदुरबार |
| २ | महाविद्यालयास भेट दिल्याची तारीख | : | २७/११/२०१० |
| ३ | स्थानिक चौकशी समिती सदस्यांची नांवे | : | १) श्री. प्रा. डॉ. पी. जे. देवरे (अध्यक्ष)<br>२) श्री. एन. पी. साळुंके<br>३) श्री. एस. बी. शर्मा<br>४) श्री. प्रा. एस. पी. शुक्ला |
| ४ | महाराष्ट्र शासनाने उपरोक्त महाविद्यालयाच्या विस्तारास (नवीन विषय/अभ्यासक्रम, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा), नैसर्गिक विस्तार , नवीन महाविद्यालयास परवानगी दिल्याचा शासन निर्णय क्रमाक व दिनांक क क | : | शासन निर्णय क्र. टिईएम-२०१०/(१६५/१०) तांशि-४ मंत्रालय मुंबई दि. ३० जुन २०१० |
| ५ | मा सहसंचालक, उ शि, जळगांव यांनी नैसर्गिक विस्तारास मान्यता दिल्याचे पत्र क्रमांक व दिनांक | : | लागू नाही |
| ६ | नव्याने विस्तारीत करावयाचे विषय/अभ्यासक्रम/ अतिरिक्त तुकडी/विद्याशाखा/ नवीन महाविद्यालयाचे विषय | : | १) सिव्हील इंजिनिअरींग ६०<br>२) मेकॅनिकल इंजिनिअरींग ६०<br>३) ईलेक्ट्रीकल इंजिनिअरींग ६०<br>४) कॉम्प्युटर इंजिनिअरींग ६०<br>५) ईलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकॉम्युनीकेशन इंजिनिअरींग ६० |
| ७ | नैसर्गिक विस्ताराचे विषय | : | लागू नाही |
| ८ | महाविद्यालयाने/संस्थेने शासन निर्णयातील सर्व अटींची पूर्तता क्केली आहे किंवा कसे ? क | : | होय |
| ९ | महाविद्यालयाने मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगांव विभाग जळगांव यांचे कर्यालयास हमीपत्र सादर केले किंवा नाही ? | : | लागू नाही |
| १० | मा सहसंचालक कार्यालयाने विद्यापीठास प्रमाणपत्र दिले किंवा नाही ? | : | लागू नाही |
| ११ | विद्यापीठाच्या अध्यादेश १७२ मधील तरतुदी तसेच राखीव निधी, तुट निधी व इतर निधींसंदर्भात नमुद केलेल्या तरतुदींचे पालन महाविद्यालयाने केले आहे किंवा नाही ? (फक्त नवीन महाविद्यालयांसाठी) ख | : | होय |